# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक ३१/७/२००७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.०६) इतिवृत्त

मंगळवार दिनांक **३१ जुलै २००७** रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री. त्र्यंबक गणपतराव तुपे** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिति सभागृह' येथे **सकाळी ११.५० वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त, नगर सचिव व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

1. श्री. मधुकर दामोधर सावंत
2. श्री. संजय पांडूरंग शिरसाट
3. श्री. हिंमतराव साळूबा दाभाडे
4. श्री. अ. रशीद खान (मामु)
5. श्री. वसंत पांडूरंग नरवडे
6. श्री. मोहन धन्नुलाल मेघावाले
7. श्री. संजय रामदास जोशी
8. डॉ.आशा बिनवडे
9. श्रीमती जयश्री सारंग किवळेकर
10. श्री. पुरूषोत्तम रघुवीरसिंग ठाकुर
11. श्री. कचरू विश्वनाथ मोरे
12. श्री. अ. साजेद अ. सत्तार
13. श्री. हाजी शेरखान अ. रहेमान

**<u>संवाद :</u>**

Ir_Vr O`Ir oH$di{H$a : ogS>H$m{Vrb AoVH«$_U H$mT>Ê`m संदर्भात या सभागृहात वारंवार चर्चा होवून आपण निर्णय दिलेला आहे. व प्रशासनास आदेशीत केलेले आहे. माझ्या वार्डात जे फुटपाथचे काम चालू आहे त्या कामास अतिक्रमणामूळे अडथळा निर्माण झालेला असून ते अतिक्रमण काढण्याचे आदेश मागिल बैठकीत आपण प्रशासनास दिले होते अदयाप कार्यवाही केली नाही. सभागृहाच्या आदेशाचे पालन होत नाही ते काढण्यास कुणाचा दबाव येतो काय ?

प्र.प्रशासकीय अधि. : अतिक्रमण काढण्याची कार्यवाही वार्ड कार्यालयाकडेच असून सेन्ट्रलाईज करण्याचे आदेश अदयाप काढलेले नाही. दोन वाहनाची गरज असून एक वाहन सिडको व एक जुन्या शहरासाठी कर्मचाऱ्याचे पथकासह देणार आहोत.त्या संबंधीची सचिका अति.शहर अभियंता यांचेकडे अभिप्रायासाठी पाठविली आहे.

श्री.संजय जेशी :अतिक्रमण विभाग सेन्ट्रलाईज करण्यासाठी तीन बैठकीपूर्वी निर्णय झालेला आहे. अद्यापका कार्यवाही झालेली नाही.

श्री.पुरूषोत्तम ठाकूर :स. सदस्यांनी अतिक्रमणा संदर्भात केलेल्या सूचनांची दखल घेतली जत नाही. प्रशासनाला या सभागृहाने आदेशील करूनही त्याचे पालन होत नसेल तर सभा घेवून अर्थ नाही तहकूब करावी.

प्र.प्रशासकीय अधि. : स. सदस्या किवळेकर जयश्री यांचे वार्डात फुटपॉथचे अतिक्रमण असून ते अति. शहर अभियंता यांना काढण्याचे आदेशीत केलेले आहे.

श्री.संजय जेशी : अतिक्रमण काढण्यासाठी ज्या त्या विभागाची जबाबदारी आहे, असे उत्तर देणे बरोबर नाही. अति.शहर अभियंता यांना अतिक्रमण काढण्याचे अधिकार नाही. असेल तर अतिक्रमण विभाग कशासाठी आहे.

शहर अभियंता : अतिक्रमण काढण्याची कार्यवाही या विभागाकडे दिली नव्हती. वार्ड अधिकाऱ्याकडे आहे.

श्री.संजय जेशी : अधिकाऱ्यानी चूकीची माहिती दिल्याबद्दल काय कार्यवाही करणार .

श्रीमती जयश्री किवळेकर : वार्ड अधिकारी यांचे अतिक्रमण काढण्या संबधीचे अधिकार मागिल बैठकीतच या सभागृहाने रद्द करून सेन्ट्रलाईज करण्याचे आदेश दिले होते. अधिकारी एक दुसऱ्याचे नाव दाखवित तीन महिण्यापासून सदर अतिक्रमण काढले नाही. मा.सभापतीच्या आदेशाचे पालन होत नसेल तर सभेला अर्थ नाही.

श्री.हिम्मतराव दाभाडे : या सभागृहात अतिक्रमणाच्या बाबतीत स. सदस्य प्रश्नउपस्थित करतात.त्यामागे तथ्य असते मी अनेक बातम्या वाचलेल्या आहे. वृत्तपत्राच्या माधयमातून खिल्ली उडवीली जते. स.सदस्या श्रीमती किवळेकर व मी तीन महिन्यापासून अतिक्रमणाच्या बाबतीत मुद्दा मांडतो परंतू त्याची कार्यवाही होत नाही.सभागृहात अधिकारी चुकीची माहिती देतात. सभागृहात झालेल्या निर्णयाची अमलबजवणी होत नसेल तर संबधीत अधिकाऱ्यावर कार्यवाही होणे अपेक्षीत आहे. मुथीयान कॉर्नर जगेच्या संदर्भात अनेक वेळा प्रश्न उपस्थित केलेला होता.रस्त्यासाठी जगा दिली म्हणून संबधीत व्यक्तीने रू.१.८६,६१०/-दिं. ९.३.१९८४ रोजी मोबदला घेतलेला आहे. मोबदला घेवून ही संबधीत व्यक्तींना पून्हा महापालिकेने जगा दिलेली आहे. अधिकारी चूकीची माहिती देवून बोगस कागदपत्र तयार करून संबधीत व्यक्तीला पीआर कार्ड तयार करून दिले. त्याजगेवर बांधकाम परवानगी दिली. हे कितपत योग्य आहे. जेपर्यत खुलासा होत नाही तोपर्यत ही बैठक स्थगित करावी.

श्री.अ.रशिद खान : वार्ड अधिकारी यांचेकडे अतिक्रमण काढण्याची कार्यवाही होत नाही. अतिक्रमण विभाग सेन्ट्रलाईज करण्याचा यापूर्वी या सभागृहाने अनेक वेळा निर्णय घेतला का कार्यवाही झालेली नाही.

मा. आयुक्त : अतिक्रमण विभाग सेन्ट्रलाईजकरण्याचे आदेश दोन तीन दिवसात काढले जतील.

श्री.संजय जेशी : प्रशासकीय अधिकारी सभागृहात खोटे बोलतात. सर्वसामान्य नागरीकाचे काय हाल होत असतील ,खोटी माहिती देणाऱ्या अधिकाऱ्यावर कार्यवाही होणे अपेक्षीत आहे. याचा अर्थ अधिकारी काम करण्यास सक्षम नाही. प्रत्येक प्रभाग कार्यालया अंतर्गत येणाऱ्या भागातील अतिक्रमण काढणार आहे की नाही याचा खुलासा करावा. शहर अभियंता यांना विशेष अधिकार दिले आहे का? असे उत्तर का दिले जते.

श्री.वसंत नरवडे पाटील : या शहरात मोठया प्रमाणात अतिक्रमणझालेले आहे. गेल्या सहा महिण्या पासून या विषयावर चर्चा होते निर्णय घेतले जते कार्यवाही होत नाही.कायम स्वरूपी

अतिक्रमण काढण्याची कार्यवाही व्हावी. जिल्हा परीषद समोरील रस्त्याच्या बाजूला फुटपाथवर तसेच रंगारगल्ली, पैठणगेट ,गुलमंडी या भागात हातगाडीवाले यांनी मोठया प्रमाणात अतिक्रमण केलेले आहे.सर्वसामान्य नागरीकांना पायी किंवा वाहनावर ज ये करणे अवघड झालेले आहे. अपघात होईल का असे वाटते. कार्यवाही करण्यासाठी कुणीही अधिकारी तेथे नसतात. कायमस्वरूपी फिरते पथक नियुक्त करावे. एक एक अधिकाऱ्याकडे जस्तीचे चार्जअसेल ते काढून घेवून स्वतंत्र नविन अधिकारी कर्मचारी या विभागात देण्यात यावे. काम वेळेवर होत नाही म्हणून नागरीकांमध्ये महापालिके विषयी नाराजे आहे. अतिक्रमणात कोणी आड येत असेल तर कायद्याने कार्यवाही करावी. यापुर्वी या विभागात राहिलेले व मक्तेदारी ठरलेल्या अधिकाऱ्यांना पुन्हा घेवू नका. ठोस निर्णय आजच घ्या. आज घेता येत नसेल तर पुढच्या सभेत काय कार्यवाही झाली ती माहिती द्यावी. पाच लोकांची कमेटी करा. सैनिक लढत असेल तर सेनापती कामाला येईल.

श्री.पुरूषोत्तम ठाकूर :माझ्या वार्डात खुल्या जगेवर टपऱ्या तसेच नंदनवन कॉलनी खुल्या जगेवर भिंतीचे काम केलेले आहे ते त्वरीत काढण्याची गरज आहे. अनेक नागरीकांनी तक्रारी केलेल्या असून माझ्याकडेही आलेले होते. काही नागरीक या संदर्भात न्यायालयात दाद मागण्यासाठी गेलेले आहे.

मा. सभापती : एक महिन्यापूर्वी प्रशासकीय विभाग एकत्रीकरण करण्याचा निर्णय या सभागृहाने घेतला अद्याप का कार्यवाही केली नाही.

मा. आयुक्त :प्रशासकीय विभाग एकत्रिकरण करण्याचेआदेश काढलेले आहे. याविभागात पूर्वी जे कर्मचारी अधिकारी होते त्यांना घेतलेले नाही. ज्यांना या विभागात काम दिले त्यांना करावेच लागेल. रजेवर कुणी जत असेल तर कार्यवाही होईल. ज्यांना बी.पी किंवा इतर मोठया आजर असल्याने अडचण असेल तर त्यांनी मला समक्ष येवू भेटावे विचार करून बदली केली जईल. तीन फिरते पथक नियुक्त केलेले आहे त्यात एक सिडकोसाठी दोन शहरासाठी आहे. तुर्त प्रशासकीय अधिकारी पदाचा कार्यभार श्री. वाहूळ यांचेकडे राहील. आताच फुटपाथचे अतिक्रमण काढण्याचा विषय निघाला त्या संदर्भात अति. शहर अभियंता यांना काम करण्याचे आदेशीत केलेले होते. मी स्वत: त्या ठिकाणी पाहणी केली होती सिडको भागात बी.टी. सोडून जे शोल्डर्स ठेवलेले आहे. कुणाला पायी जयचेअसेल तर ब्लॅक टॉपवर फिरावे लागते. त्यामूळे ट्राफिकसाठी प्लॅन असायला पाहिजे फुटपॉथ कन्टीन्यूव करावे लागेल. तसेच पूर्ण सिडकोभागात स्टॅण्डर्ड पध्दतीनेकाम करावे लागेल. एवढी जस्त जगा सोडलेली आहे. फुटपॉथ एवढे मोठे ही करू शकणार नाही.जर मोठे केल्यास त्या फुटपाथवर लोकांनी आपआपल्या घरासमोर गाडी पार्क केलेली आहे. १.२ मीटर इतके फुटपाथ करावे लागेल.

श्रीमती जयश्री किवळेकर : संबधीत व्यक्तीने घरासमोर बाड व एक शोभेचे झाड लावलेले आहे. सदर व्यक्तीने कंपाऊड वॉलच्या पूढे साधारत:१० ते ११ फुट म्हणजेच जे दोन मी. फुटपाथसाठी सोडलेली जगा त्याही पूढे जवून दोन मी. पर्यत रस्त्यावर अतिक्रमण केलेले आहे. प्रशासनाला महापालिकेच्या जगेची किमंत वाटत नाही का?

मा.आयुक्त : जगेच्या किमंतीचा प्रश्न नाही. शोल्डरवर आहे. त्याचा नकाशा करावा लागेल.फुटपॉथनंतरथोडीशी जगा सोडायला पाहिजे या शहरात रस्त्यावरून ज्या

जगेवरून दोन/चार चाकी वाहने जतात त्याच जगेवरून पायी चालावे लागते. त्यामूळे लेन खराब होते व अपघाताचे प्रमाण ही वाढते.

श्री.संजय शिरसाट : अतिक्रमणाच्या संदर्भात वारंवार स्थायी समिती सर्वसाधारण सभेत प्रश्न उपस्थित होतात. गेल्या दोन वर्षापासून या सभागृहात स. सदस्य अतिक्रमणाच्या बाबतीत मुद्या मांडतात. मा.आयुक्त त्यांचे लोकाना घेवून व्हिजेट करतात. खामनदीच्या संदर्भात स.सदस्य श्री. रविकांत गवळी हे नेहमी प्रश्न विचारतहोते. त्या नदीचे पात्र ४० मी. हून ३५ नंतर ३० नंतर २५ मी. झाले आता किती मी. आहे मला माहित नाही. असे करूनहीकाही अतिक्रमण मध्ये येते म्हणून त्यात दलाली सुरू झाली. रात्री लोकांच्या घरी जवून तुमचे घर नाल्यावर आहे पाडू देत म्हणून पैशाची मागणी करून पैसे घेतलेत.फीरते पथक करणार आहे. त्याचे प्रोव्हीजन काय आहे कर्मचारी वर्ग देणार की नाही. नसता जुनी वाहने देवून त्या पाच कि. मी. पर्यत गेल्यानंतर बंद पडतात तसे व्हायला नको. कार्य.अभियंता म्हणेल माझेकडे मॅन पावर नाही. मा.आयुक्त म्हणतील कर्मचारी भरती करण्यास शासन मंजूरी देत नाही. पुन्हा पूर्वीसारखी ही योजना बारगळणार आहे. माझ्यासारखा सदस्य सांगले कोकणवाडी भागात एक कोटीची जगा आहे तेथे ड्रम प्रोजेक्ट येतो तेथे एक अतिक्रमण झाले ते काढा तर काढू शकत नाही. नगरसेवकांनी अतिक्रमणांस पाठींबा दिला तर सभासदत्व रद्द होते. यासभागृहात स. सदस्यांनीअनेक ठिकाणच्या अतिक्रमणाविषयी मुद्दे मांडले परंतू अधिकारी संबधीत ठिकाणी जवून नगरसेवक बोलात म्हणून कार्यवाही करावीलागत आहे असे सांगतात. आजही बी ॲण्ड सी कार्यालयाच्या बाजूला १० हजर स्वेअर फुट महानगरपालिकेची जगा आहे. एखादे वैयक्तीक अतिक्रमण असेल ते काढण्याचे सदस्य मागणी करीत असेल समजू शकतो वैयक्तीक जगा आहे अतिक्रमण काढले जत नाही परंतू ही महानगरपालिकेच्यामालकीची जगा असतांना अतिक्रमण काढले जत नाही. दुर्दैवआहे. जेव्हा मा. आयुक्त महापालिकेत रूजू झाले त्यावेळी सुध्दा अतिक्रमण विभागाचे दोन भाग करावे म्हणून सूचना केलेल्या होत्या. एक प्रशासकीय अधिकारी काम करू शकतात. सहा ते सात इमारत निरीक्षक होते त्यांना जस्त माहिती होती त्यांच्या आता बदल्या केल्या. नवीन जे आले त्यांना सुध्दा नगरसेवकांच्या मार्फत पत्र आल्यानंतर अतिक्रमण काढण्याची हिम्मत होत नाही पत्र येते इमारत निरीक्षक प्रशासकीय अधिकारी यांचेकडे देवून टाकतात. अधिकारी सांगतात मॅन पावर नाही. दोन दिवसांनतर पोलीस कर्मचारी मिळाल्यानंतर बघू.महापालिकेने पोलीस विभागाकडून पोलीस शिपाई घेतलेले आहे त्यांचे पगार व इतर खर्चापोटी वर्षाला ८० लक्ष खर्च महापालिका देते. याचा विचार प्रशासन करणार की नाही. अतिक्रमण करण्याची कुणलाच भिती वाटत नाही. सात फुटाच्या आत भिंतीचे काम चालू असेल तर २४ तासाची नोटीस दयावी लागते. जर भिंतीचे पूर्ण काम केले चुना मारला जर ते पाडायचे असेल तर ३० दिवसाची नोटीस द्यावी लागते. नागरीकांनी किंवा नगरसेवकांनी पाठपूरावा केला नाही तर ते अतिक्रमण कायम होते. म्हणून परवानगी घेण्या पेक्षा अतिक्रमण केलेले केंव्हा ही चांगले अशी भावना लोकांचया मनात निर्माण झालेली आहे. जेनियोजन प्रशासनाने केलेले आहे, अतिक्रमण विभाग तसेच आरोग्य विभाग सक्षम करावा या शहराचे चित्र नक्कीच चांगले बघायला मिळेल.

श्री.अ.रशिद खॉन : इमारत निरीक्षक यांनी खाकी गणवेश असावेत जेणे करून लोकांना माहिती राहिल. उपआयुक्ताकडे रजिस्टर ठेवावे. रोजच्या रोज काय काम केले त्याचा अहवाल उपआयुक्तांनी ठेवावा नसता उपआयुक्त यांना जबाबदार धरावे.

श्री.पुरूषोत्तम ठाकूर : माझ्या वार्डात खूल्या जगेवर टपरीझालेली आहे तसेच नंदनवन कॉलनी ते पानचक्की हा डीपी रोड ४० वर्षापूर्वी मंजूर झालेला आहे. त्या रस्त्याचे काम होणार की नाही जर प्रशासन कार्यवाही करीत नसेल तर उपोषण करावे लागेल नसता मला राजेनामा दयावा लागेल याची नोंद घ्यावी.

मा.आयुक्त : सदर रस्ता भुसंपादनासाठी जिल्हाधिकारी यांचेकडे पाठवून संयुक्त मोजणीसाठी पैसेही भरलेले आहे. जगेचे भुसंपादन झाल्यानंतर महापालिकेची मालकी होईल त्यानुंतर अतिक्रमण काढण्याचा प्रश्न येतो. खामनदीचे पात्र एक सारखे नाही गाव नकाशा आहे त्याप्रमाणे रेकॉर्ड आहे. याची मोजणी करावी म्हणून जिल्हाधिकारी यांना कळवून त्या विभागाचा आवश्यक कर्मचारी देवून १०० टक्के मोजणी गाव नकाशा प्रमाणे झाली.केलेला जे सर्वे केला तो टेक्नीकली बरोबरआहे असे प्रशासनाचे मत आहे.काही लोकांची जगात्यात येत असल्याने ते लोक गैरसमजपसरविण्याचा प्रयत्न करीत आहे. त्याचां सर्वे झाल्यानंतर महापालिकेने प्लॅन टेबल सर्वे करून घेतला, त्यात किती लोकांच्या जगा येतात. त्यांना नोटीसेस द्याव्या लागतील. मोजणी नकाशाप्रमाणे ज्यांच्या जगा आलेल्या आहेत अशांना पर्यायी जगा देण्याचे सर्वसाधारण सभेने मान्य केलेले आहे त्या बाबतीत नकाशा तयार झालेला आहे कार्यवाही चालू असून त्यांना जगा दिल्यानंतर जेनदीच्या पात्रात येत आहे ते काढून घेण्याच्या सूचना द्याव्या लागतील.

श्री.मधुकर सावंत : ज्या लोकांनी प्लॉटींग पाडून जगा या गरीब लोकांना विकली त्यांचेवर काय कार्यवाही करणार आहे.महापालिकेला अधिकार आहे. अनधिकृत प्लॉटींग करून ज्यांनी विकली त्यांचे विरूध्द प्रशासनाने पोलीसात गुन्हा दाखल करायला पाहिजे

मा. आयुक्त : ज्यांची फसवणूक झाली त्यांनी जगा ज्यांच्याकडून घेतली त्यांचे विरूध्द पोलीसात गुन्हा दाखल करावा.महापालिका साक्ष देईल की संबधीतांनी नदीची जगा विकली होती.

श्री.वसंत नरवडे : मोजणी झाल्यानूसार जी घरे आलेली आहे ती पाडणार आहेत की नाही.

मा.आयुक्त : मोजणी करण्यास तीन चार महिनेलागले मोजणी झाल्यानूसार जी घरे आलेली आहे ती सर्व पाडावी लागणार आहे.सर्वेचे काम १०० टक्के चांगले झालेले आहे. हर्सूल भागात एक डीसहाऊस लोकांसाठी आरक्षण आहे त्यास सर्वसाधारण सभेचीमान्यता मिळालेली आहे.

श्री.हिम्मतराव दाभाडे : मी पत्र देवून प्रशासनाकडे माहिती मागविली होती त्याचे उत्तर मला ९.७.०७ रोजी मिळाले त्यात श्री. एम.टी. घोरपडे यांची १२०० क्वे. फुट जगा डी.पी रोड मध्ये गेलेली होती. चेक नं. ६२९८७६ या द्वारे रू. १,८०,६१०/-इतका मोबदलासंबधीत व्यक्तीला देण्यात आला. त्यानंतर संबधीत व्यक्ती यांनी बोगस कागदपत्र तयार करून पून्हा महानगरपालिकेकडून जगा घेतली सर्वे नं. ५ मध्ये होती सर्वे नं. ६ मधील जगा संबधीत व्यक्तीनी अतिक्रमण केलेले आहे. जगेवर बांधकाम चालू आहे. यासंदर्भात मा. सभापती मा. आयुक्त यांना पत्र ही दिलेले आहे प्रशासनाने सदर ठिकाणी जवून पाहणी केलेली आहे काय? सदर व्यक्तीनी दोन

ठिकाणी इमारती बांधलेल्या आहे. कोणत्या इमारतीचे बांधकामासाठी त्यांनी परवानगी घेतलेली आहे किंवा नाही याचा खूलासा होणे अपेक्षीत आहे.

मा.आयुक्त : या प्रकरणाची संचिका लगेच मागवून खूलासा केला जईल.

श्री.मधुकर सावंत :बाबा हरदास नगर भागात एकाव्यक्तीने १४ ते १५ हजर क्वेअर फुट महापालिकेची खूली जगा अतिक्रमण करून ६० लक्ष मध्ये विक्री केली ५लक्ष रू. इसार घेतलेला आहे. लवकरच जगा हस्तांतर करणार आहे. या संबध सभागृहात दोन तीन वेळेस मुद्दा काढला परंतूत्याची दखल घेतली नाही. जर यानंतर कार्यवाही केली नाही तर चर्चा करून अर्थ नाही. महापालिकेच्या मालकीची जगा सांभाळण्याचे काम महापालिकेचे असते नगरसेवकांचे नाही. महानगरपालिकेची जगा वाचवता येत असेल तर वाचवा.

मा. सभापती : सदर जगा महानगरपालिकेची असेल, जगेवर अतिक्रमण झालेले असेल तर ते तात्काळ काढून महानगरपालिकेने त्या जगेवर महापालिकेच्या मालकीची जगा असल्याचे फलक लावण्यात यावे.

मा. आयुक्त : कुणी कूणास विक्री केली त्याच्याशी घेणे देणे नाही. महापालिकेच्या जगेवर अतिक्रमण झाले असेल तर ते काढण्याचे काम महापालिकेचे आहे.

डॉ. आशा बिनवडे : त्रिमुर्ती चौकात महानगरपालिका भाजे मंडई आरक्षण क्र.२२७ भाजेमंडई व बाजुलाच २२८ उद्यान आहे. काही दिवसापुर्वीच अतिक्रमण काढलेले होते. मी निवडून आले त्यानंतर २-३ वेळा तारकुंपण करण्याचा प्रयत्न झाला होता तेही काढले गेले होते. आरक्षण क्र.२२७, २२८ चा विकास होत नाही. आरक्षण क्र.२२७ जगेचा खरेदी विक्री व्यवहार झाला अशी माहिती मिळाली. म्हणून मी चर्चाही केलेली होती. आपण यापुर्वी सूचना दिल्या होत्या. परंतू काहीही कार्यवाही अद्याप झालेली नाही. त्यामूळे त्या जगेवर कोणताच विकास करता येत नाही भाजे मार्केट सुध्दा रिकामे आहे. त्या जगेचे पीआर कार्डही तयार होईल त्यासाठी त्वरीत जगा महापालिकेच्या ताब्यात घेण्यात यावी.

मा. आयुक्त : अशा किती जगा आहेत की महापालिकेची जगा आहे. कोणत्याकारणामूळे महापालिकेकडे आलेली आहे किंवा येणे गरजेचे आहे. तसेच पीआर कार्ड नाही व पजेशनही नाही. किती जगेवर अतिक्रमण आहे. यासाठी चार सेवानिवृत्त अधिकारी चौकशी साठी नियुक्त करीत आहे. आजच्या बैठकीला ऐनवेळी तो प्रस्ताव आहे. त्यात श्री. खरवडकर यांना समावेश केलेले आहे. सन १९८२ पासून किती जगा मोबदला देवून वाटाघाटीने किंवा एफएसआय देवून महापालिकेने ताब्यात घेतलेल्या आहेत त्याचे सर्व पीआर कार्ड तयार करून घेण्याची तसेचजगेचासर्वे करून घेण्याची जबाबदारी त्यांचेवर देण्यात आलेली आहे.

डॉ. आशा बिनवडे : सदर जगा गायरानची असून त्या संबधीचेसातबारा वगैरे मी प्रशासनाकडे दिलेले आहे.

मा.आयुक्त : सदर जगा जिल्हाधिकारी यांचे अंडर मध्ये येते. महापालिकेच्या नावावर करून घेण्याची कार्यवाही होईल.

श्री.मधुकर सावंत : महानगरपालिकेच्या वतीने करारनामा केलेला आहे. आखीव पत्रिकेवर आपले नांव होते. नंतर कमी झाले.

| | |
|---|---|
| श्री.वसंत नरवडे | :सहा. संचालक नगररचना महापालिकेत हजर नसतांना त्या विभागाचे काम चालते. लोक परवानगी साठी येतात परवानगी घेतात व अंडरग्राऊड खोदकाम करून व प्लीन्थ लेवलच्या मजल्यावर पाच फुट जगा सोडलेली दाखवून बांधकाम शहरात होत आहे याकडे कुणीही लक्ष देत नाही. कायमस्वरूपी सहा.संचालक नगर रचना येणार नाही, जे चार सेवानिवृत्त अधिकारी जगेची तपासणीसाठी घेत आहोत त्याच बरोबर श्री. खरवडकर यांना घेण्यात येणार असे म्हटले ते हजर नसतांना त्यांची सेवा चालू आहे. ते सध्या येथे नाही. जेउपअभियंता येथे आहे त्याची नियुक्ती करावी. |
| श्री.संजय सिरसाट | : नगर सचिव श्री. पठाण यांना सर्व शहराची माहिती आहे पूर्वी ते त्याच विभागात होते. त्यांना अतिरिक्त काम देण्यात यावे. |
| श्री.वसंत नरवडे | : नगरसचिव श्री. पठाण यांना समावेश केल्यास हरकत नाही. |
| मा. आयुक्त | : मागिल काळात महानगरपालिकेने घेतलेल्या जगा व त्याचे पीआर कार्ड तयार करणे मालमत्तेचे रजिस्टर वेगळे करून घेणे गरजेचे आहे. |
| श्री.वसंत नरवडे | : श्री. खरवडकर किती दिवसापासून गैरहजर आहे. ते सध्या कूठे काम करतात. कुठल्या दाराने येतात कुठल्या दाराने जतात याचा खुलासा व्हावा व इमारत परवानगी देत असतांना प्लींन्थ कंम्पीशनशिवाय वरील इमारतीचे काम होवू नये. नसता या शहरात आहे तेच रस्ते राहतील मोठे होणार नाही. |
| श्री.संजय जेशी | : प्लिन्थ कम्प्लीशन दिल्या शिवाय पूढील परवानगी द्यायचीच नाही असा नियम करावा. लक्ष कोण ठेवणार. |
| मा. आयुक्त | : सुरूवातीला तीन महिन्याची परवानगी देणार आहे. त्यानंतर आर्कीटेक्टचे प्रमाणपत्र आल्यानंतर उर्वरीत बांधकामस ९ महिने परवानगी देणार आहे. |
| श्री.वसंत नरवडे | : काही ठिकाणी १५ मी. रस्ते असतांना अंडर ग्राऊड करतांना त्याची प्लिन्थ १० फुट पर्यंत वाढलेली आहे.पार्कीगच्या नावाखाली अनेक लोकांनी रस्त्याच्या जगेवर बांधकाम केलेले आहे. भविष्यात वाहतूकीला त्रास होणार आहे. क्रांतीचौक ते पैठणगेट रंगारगल्लीच्या रस्ता रूदींकरणाचा प्रस्ताव शासनाकडे गेलाकुठपर्यत कार्यवाही आलेली आहे.तरतुद ठेवायची व पून्हा त्यातून दुसरेच काम करायचे हे बरोबरनाही. यावर दोन महिण्यात ॲक्शन घेतली नाही तर मी स्वत: सदस्य या नात्याने मा.न्यायालयात दाद मागणार आहे. |
| श्री.अ.रशिद खॉन | : सहा.संचालक नगररचना कोण आहे सभागृहाला माहिती नाही. |
| श्री.संजय जेशी | : एखाद्या अधिकाऱ्याला सभेच्या दिवशी गैरहजर राहायचे असेल तर मा.आयुक्त किंवा मा.सभापती यांची परवानगी घेणे आवश्यक आहे. |
| मा. आयुक्त | : सहा. संचालक नगरररचना यांचेकडे दोनचार्ज आहेत. नवीन अधिकारी लवकरच येत आहे. मुख्यलेखा परीक्षक या पदाचे अधिकारीही लवकरच येत आहे. |
| श्री.संजय जेशी | : सहा. संचालक नगररचना व महापालिकेचेउपआभियंता यांचे वेतन जवळपास सारखेच आहे उपअभियंता यांना तात्पुरता चार्ज देण्यात यावा. आयुक्तांना अधिकार आहे. |
| श्री.अ.रशिद खॉन | : किराडपूरा भागात असलेल्या महापालिकेच्या शाळेच्या इमारत मालक यांनीभाडे वाढवावे म्हणून पत्र दिले कार्यवाही झाली नाही एका रात्रीत शाळेच्या इमारतीचाकाही भाग पाडण्यात आला. पत्रे काढले.सदर शाळेत ७०० विदयार्थी शिक्षण घेतात. त्या बाबतीत प्रशासनाने काय ॲक्शन घेतली आहे. |

| | |
|---|---|
| मा. आयुक्त | : या संदर्भात एफआयआर दाखल केलेला आहे. जेंव्हा मुख्याध्यापकानी फिर्याद दिली त्यात अग्यात लोकांनी केले म्हणून म्हटले आहे. |
| श्री.अ.रशिद खॉन | : पत्रे चोरीला गेले. वेळ खराब झाला. विद्यार्थी पावसात बसलेले आहे. जे नुकसान झाले ते व सदर व्यक्तीचे नाव का टाकण्यात आले नाही. संबधीताचे ते नातेवाईक आहे त्यांनीच हे काम केलेले आहे. |
| मा.. आयुक्त | : कालच पी.आय. व पोलीस आयुक्त यांचे बरोबर माझी चर्चा झालेली आहे. ५० हजराचे नुकसान झालेले आहे तशी फिर्याद दिली. कोर्टाची परवानगीने तपास करणाार कोणी केले म्हणून. |
| श्री.अ.रशिद खॉन | : सदर शाळेत ७०० च्या वर विद्यार्थी होते. जस्तीत जस्त वर्ग असतील संपूर्ण पडझड करण्यासाठी दोन तीन दिवस लागू शकतात तरीही कूणाचे लक्ष गेले नाही. कूणी केले हे सर्व संबधीताना माहित आहे परंतू फिर्याद देतांना नाव का टाकले नाही. |
| श्री.अ.साजेद्द अ.सत्तार | : मा. महापौर, उपआयुक्त यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. श्री. मझरूल हक यांचे नाव दिलेले होते. सदर ठिकाणी शाळेचे बांधकामही सूरू केलेले आहे. घर मालकाने हे कृत्य केले त्यांचे नावाने फिर्याद दाखल करण्यास हरकत नव्हती. |
| श्री.वसंत नरवडे | : भाडे वाढीसाठी घरमालकाने मुख्याध्यापक तसेच शिक्षणाधिकारी यांचेकडे पत्र दिले होतेत्याची दखल घेतली त्या मालकाचे नाव नमुद असतांना जर अचानक शाळा कूणी बंद पाडली असेल तर त्या बाबतीत मुख्याध्यापक व घरमालकावर गुन्हा दाखल केला पाहिजेपत्राची दखल का घेतली नाही मुख्याध्यापक व शिक्षकांना गरज नव्हती का. |
| श्री.अ.रशिद खॉन | : ही इमारत दुसऱ्याची होती. श्री.मझरूल हक यांनी त्यांचे शाळेसाठी खरेदी केली त्यानंतर अर्ज दिला केंव्हा खरेदी केले माहिती नाही. डायरेक्ट रिकामी करण्यासाठी मागणी केली. |
| श्री. अ.साजेद्द अ.सत्तार | : भाडे वाढविण्या सदर्भात शिक्षणाधिकारी यांनी म्हटले होते मा.आयुक्तांनीत्यांना वेळ दिला होता. मालमत्ता विभागाकडे संचिका पाठविली परंतू भाडे वाढविण्याचा निर्णय घेण्या आधीच घर मालकाने हा प्रकार केला तेथील ४५०रू. तसेच पत्रे चोरी गेलेले आहे. महापालिकेने रू.१.२० लक्ष खर्च करून दुरूस्ती करून पूर्ण नवीन केले होते त्यातून भाडे वसूल केले जत होते. यात महानगरपालिकेची बदनामी झालेली आहे. संबधीतावर कार्यवाही व्हावी. |
| मा. आयुक्त | : एक महिण्यापूर्वी अर्ज दिलेला होता. १९८५ पासून तेथे शाळा चालू आहे. संबधीतास मालमत्ता कराचे बेबाकी प्रमाणपत्र पाहिजेहोते. त्यांनी ती इमारत कुणाला तरी विकली असेल. मालमत्ता कराचे पैसे देणार नाही त्या व्यतिरिक्त मला पैसे द्यावे असे म्हणणे होते. त्यावर करारनाम्याची प्रत दाखवावी म्हणून मी म्हटले होते. एक छायाप्रत दाखवली त्यात मालमत्ता कर व्यतिरिक्त असेल असे त्यात दाखविले त्यानूसार रेकॉर्ड शोधतो म्हणून म्हटले १९८२ च्या प्रमाणे रू ११७० कॅल्क्यूलेशन केले होते. सर्व तपासणी केल्यानंतर १५ ते २० दिवसानंतर माहिती दिली जईल त्यानंतर अशी घटना घडली. जेनुकसान झाले ते नमुद करावे. गुन्हा दाखल करण्याचे निर्देश दिले. मुखयाध्यापकासमोर हा प्रकार घडला नसल्याचे गुन्हा दाखल करतांना त्यांनी नाव दिले नाही. |

श्री.अ.साजेद्द अ.सत्तार :शाळातोडण्याचेकाम जेंव्हा चालू होते आजूबाजूच्या लोकांनी विचारणा केली असता संबधीतांनी आम्हाला महापालिकेनेदुरूस्तीचे काम दिले म्हणून सांगितले जत होते. ज्यादिवशी हे काम केले त्या दिवशी सुट्टी होती त्या शाळेत चौकीदार नाही म्हणून निदर्शनास आले नाही.

मा. आयुक्त : पोलीस आयुक्त यांचेशी चर्चा झालेली आहे. मुलांच्या बाबतीत असल्याने लवकरच चौकशी करण्याचे आश्वासन त्यांनी दिलेले आहे. मा. न्यायालयात प्रकरण जईल. महापालिकेचे कर्मचारी अधिकारी यांना विचारणा होईल सर्व रेकॉर्ड तपासणी केल्यानंतर कोर्ट जे निर्णय देईल त्या प्रमाणे कार्यवाही होवून झालेल्या नुकसानीची वसुली केली जईल.

श्री.अ.रशिद खॉन : नाव टाकले नाही कसे आरोपी सापडतील. लोकांच्या समोर हा प्रकार झालेलाआहे. नाव टाकावयास पाहिजे होते. मा. न्यायालयासमोर प्रकरण गेले असते त्यावेळी परीस्थिती बघून परत घेतले असते. नाव न टाकल्यामूळे या प्रकरणात काहीही तथ्य नाही.पैसे चोरी गेल्यानंतर ३९२ ची कलम लागते. पैसे चोरी गेले नाही असे म्हणता. जेनूकसान झाले तिथल्या तिथे झाले.

श्री.मुधकरसावंत : शाळा ताबडतोब सुरू करण्याचीकार्यवाही करावी.

श्री.अ.रशिद खॉन : शाळा त्वरीत सुरू करण्यात यावी.

मा. आयुक्त :दोन दिवसातशाळा सुरू होईल. ज्यांच्या मुळे नुकसान झाले त्याचेकडून वसूल करण्याची कार्यवाही होईल. शाळेसाठी ही इमारत योग्य असेल तर ती खरेदी केली पाहिजेअसे माझे मत आहे.

श्री.संजय सिरसाट : जेपर्यत आरोप सिध्द होत नाही तोपर्यत भाडे देण्यात येवू नये.

मा. सभापती :विद्यार्थ्याची गैरसोय होणार नाही याची दखल घेत शाळेचे दुरूस्तीचे काम त्वरीत करण्यात यावे.

मा. आयुक्त : दोन सुरक्षा रक्षक देण्यात आलेले आहे. दोन दिवसात शाळा सुरू होईल.

श्री.अ.रशिद खॉन : एका शाळेला कूणी तरी कूलूप लावली व चावी स्वत: कडे ठेवली असे करता येते का खूलासा करावा.

मा. सभापती : शिक्षणाधिकारी यांनी खूलासा करावा.

शिक्षणाधिकारी : नारेगाव शाळेत शिक्षक संख्या कमी व विद्यार्थी संख्या जस्त असल्यामुळे शिक्षकाची मागणी केलेली होती. ते न दिल्याने शाळेला कूलूप लावण्यात आले होते. ज्यांनी कूलूप लावले त्यांचेकडून काल संध्याकाळी चावी आणून पुन्हा शाळा सुरू केलेली आहे. तीन शिक्षक होते आणखी दोन दिले. एक शिक्षक निवडणूकीच्या कामासाठी गेलेले आहे. सबंधीतांना समजवून सांगितले १ ते ७ वी पर्यत वर्ग चालतात.

श्री.अ.रशिद खॉन : कोणत्या नियमाने बाहेरील व्यक्तीला कूलूप लावण्याचा अधिकार आहे. ज्यांनी कूलूप लावले त्यांचे वर पोलीस गुन्हा दाखल केला का किवा काय कार्यवाही करणार आहे.

श्री.अ.साजेद्द अ.सत्तार :ज्यांनी कूलूपलावले त्यांनी उपआयुक्त प्र यांनी भेट दिली त्यांची संबधीतानी खिल्ली उडविली संबधीतावर कार्यवाही होणे आवश्यक आहे.

श्री. वसंत नवरडे : जेंव्हा मा.महापौर व्हिजेट साठी गेले तेंव्हा कूणीतरी विद्यार्थ्यांनी मा. महापौरकडे चावी आणून दिली.

डॉ. आशा बिनवडे : १ ते ७ वी पर्यत वर्ग चालतात तेथे सात शिक्षकाची आवश्यकता असतांना तीनच शिक्षक काम करीत होते. माझ्या वार्डातही दोन शाळा आहे. जेंव्हा विदयार्थी संख्याजस्त आहे वर्ग चालतात तेथे शिक्षक असणे गरजेचे आहे. चार चार वर्ग एक शिक्षक सांभांळतात अशी परीस्थिती असल्यास विदयार्थ्याचे शिक्षणावर त्याचा परीणाम होतो. शिक्षकाची मागणी करूनही दिले जत नाही. माझ्या वार्डातील शाळेत १५० पेक्षा जस्त ॲडमीशन झाले. शिक्षक दिले नाही तर विद्यार्थी संख्या कमी होवून आपोआपच शाळा बंद होतील. ज्या वर्गात जेवढी संखया आहे त्या एका वर्गासाठी एक असणे आवश्यक आहे त्यासाठी काय करता येईल ते करावे. जे मानधनावर शिक्षक घेणार आहे. त्वरीत घेण्यात यावे.जवाहर कॉलनीच्या शाळेचा स्लॅब पडत आहे. त्यामूळे दोन शिफ्ट मधील शाळा एका शिफ्ट मध्ये भरवावी लागते सर्व विद्यार्थी खालच्या मजल्यावर बसवावे लागते. त्वरीत शाळेचे काम करण्याची कार्यवाही करावी अशी विनंती.

मा. आयुक्त : आजच्या आज कनिष्ठ अभियंता यांना पाठवून ६७ (३)(क) मध्ये ते काम तातडीने करण्यात येईल.

श्री.अ.रशिद खॉन : पाच लोक असे आहेत की आमच्या संस्थेच्या शाळेकडे महापालिकेची शाळा दयावी म्हणून तोडफोड तसेच बंद करण्याचे प्रकार होतआहे.

मा. आयुक्त : या वर्षी विदयार्थी संख्याजस्त झालेली आहे म्हणून २५ ते ३० शिक्षक कमी आहे. सर्वसाधारण सभेच्या मंजूरीसाठी प्रस्ताव ठेवलेला आहे. त्याचा खर्च बजेट मध्ये यायला पाहिजे

श्री.वसंत नरवडे : यासभागृहात प्रत्येक सदस्यांना बोलण्यासाठी स्वतंत्र माईक असावेत. काही शाळा देण्याचे प्रयत्न होत आहे. परंतू चांगल्या शाळा बंद पाडण्याचे कृत्य कुणी करीत असेल तर त्यास पायबंद घालावे. जे सेवानिवृत्त शिक्षक घेणार आहे त्यांचेवर प्रशासनाचे नियत्रंण असणार आहे का नसता केंव्हाही येतील जतील असा प्रकार व्हायला नको. कोटयावधी रूपये महापालिकेच्या शाळेवर खर्च केले जते परंतू निकाल हा शुन्य आहे.

मा. आयुक्त : जे सेवा निवृत्त शिक्षक घेण्यास सर्वसाधारण सभा मान्यता देईल. त्या पदास शासनाची मान्यतेसाठी पाठवावे लागेल. मान्यता येईपर्यत सेवा निवृत्त शिक्षक असतील त्यानंतर त्यांना कायम सेवेत ठेवावे म्हणून म्हण्ण्याचा अधिकार असणाार नाही.

श्री.वसंत नरवडे : ज्या शिक्षकांना घेणार आहे त्यांचेवर जबाबदारी फिक्स करावी.

श्री.अ.साजेदअ.सत्तार : किती शिक्षक कमी आहे.

मा.आयुक्त : नियमानूसार ३० सप्टेंबर रोजी विद्यार्थी संख्येनुसार किती शिक्षक असावेत हे निश्चित केले जते. आजच्या स्थितीला नियमाने २५ शिक्षकांची आवश्यकता आहे. २५ शिक्षक भरण्यासाठी सभेपुढे तसाप्रस्ताव येईल त्यानंतर शासनाकडे मंजूरीसाठी जईल. ३० सप्टेंबरच्या नंतर समायोजनची प्रक्रिया शासन करेल.

श्री.मधुकर सावंत : वृत्तपत्रात आले की शिपाई मुलांना शिकवितात खूलासा करावा.

शिक्षणाधिकारी : ही चूकीने बातमी आलेली आहे. शिपाई विदयार्थ्यानाशिकवीत नाही. मराठी माध्यमचे २८ व उर्दू माध्यमचे ७ शिक्षक कमी आहे.

श्री.हिम्मतराव दाभाडे : माझ्या वार्डात एकनाथनगर भागात असलेल्या शाळेत विदयार्थी संख्या जस्त असून शिक्षकाची मागणी केली होती. शाळेला फर्नीचर तसेच ५ वी ते ७ वी च्या विदयार्थींना पंजबी ड्रेस असावा,चौकीदारास एक खोली तसेच शाळेचे लाईट मीटर नादुरूस्त असून विदयार्थी शिक्षकासाठी स्वच्छतागृह नाही मा. आयुक्तांनी शाळेला व्हिजीट द्यावी व तेथील समस्या सोडवाव्या.

श्री.संजय शिरसाट : शिक्षकाची तसेच शाळेसाठी लागणारे फर्नीचर याची नियमीत मागणी हेते परंतू शिक्षण विभागाकडून यास प्रतिसाद मिळत नाही. मोहसीन पहेलवान याचे मालकीची शाळेसाठी भाडेने इमारत आहे. १० ते १२ विदयार्थी आहे. २२हजर भाडे दिले जते. गरीबाची मूले आहे मुलांना उन्हाचा त्रास होतो म्हणून स्वेच्छानिधीतून कुलर घेतले. नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतून संगणक घेतलेले आहे ते आज रोजी किती शाळेत अस्तित्वात आहे याचा शिक्षणाधिकारी यांनी खूलासा करावा. ज्योतीनगर भागात १ ते ४ थी पर्यतचे सर्व विद्यार्थी एकाच वर्गात बसतात. चेलीपूरा शाळेत पाहणी करावी जेथे १५ विदयार्थी असेल तेथे पाच शिक्षकाची गरज आहे का याचाही विचार केला पाहिजे जर स्वेच्छानिधीतील संगणक शाळेत नसतील तर एक तर मुख्याध्यापक यांनी किंवा त्या नगरसेवकांने घेवून गेले ज्यांनी नेले त्यांचेवर कार्यवाही झाली पाहिजे १५ विदयार्थ्यासाठी ५ शिक्षक व ७०० विद्यार्थी असेल तरी पाचच शिक्षक देणे योग्य नाही.

मा. आयुक्त : ज्या ज्या शाळेत संगणक दिलेले होते त्यांची सर्व तपासणी करण्यात येईल. ज्या शाळेत विद्यार्थी संख्या कमी आहे तेथील काही शिक्षकांच्या नुकत्याच बदल्या केलेल्या आहेत.

मा. सभापती : ज्या शाळेत विद्यार्थी संख्या कमी असेल ती शाळा बाजूच्या भागात असलेल्या शाळेत मर्जकरावी.

श्री.पुरूषोत्तम ठाकूर : माझ्या वार्डातील शाळेत अनेक दिवस संगणक यंत्र तसेच पडून होते कूणीही वापर केला नाही. तसेच बजेट मधील विकासकामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले नाही वाचनालयासाठी तरतूद होती. येत्या चार तारखेला वाचनालयाच्या इमारतीचे उद्घाटन असून तेथे कोणतेही पुस्तके आलेली नाही.

श्री.वसंत नरवडे : माझ्यावार्डात जिल्हा परीषदेच्या ठिकाणी महानगरपालिकेचीशाळा भरते तेथे ३० ते ४० विद्यार्थी असून ती शाळा इतर दुसऱ्या शाळेत मर्ज केल्यास तेथील चार ते पाच शिक्षक उपलब्ध होतील. जेथे उर्दू माध्यमचे शिक्षक कमी असेल तेथे उर्दू माध्यमचे शिक्षक देण्यात यावे.

शिक्षणाधिकारी : जेथे कमी जस्त शिक्षक झालेले आहे त्या संदर्भात मा. आयुक्ताच्या आदेशानूसार समायोजन शिक्षकाच्या सम्मतीने ३३ अधिक ४ असे ३७ शिक्षकाचे समायोजन केलेले आहे.

श्री.संजय सिरसाट : चेलीपूरा तसेच ज्योतीनगर भागातील शाळेत विद्यार्थी संख्या किती शिक्षक तसेच त्या इमारतीचे भाडे किती याची माहिती दयावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : कैसरकॉलनी भागातील शाळेला किती भाडे दिले जते.

श्री.मधुकर सावंत : शिक्षणाधिकारी यांनी आतापर्यत किती शाळेला भेटी दिलेल्याआहे.

शिक्षणाधिकारी : ७० ते ७२ शाळेला आजपर्यंत मी भेटी दिलेल्या असून कैसरकॉलनीतील शाळेत तीनशिक्षकाची गरज असून एक शिक्षक जस्तीचे आहे. विद्यार्थ्याची संख्या सध्या नाही. ती संपूर्ण माहिती पुढील बैठकीत दिली जईल.

श्री.संजय जेशी : शिक्षणाधिकारी यांना शाळेवर लक्ष ठेवण्याचे काम आहे. जून मध्ये असलेली विद्यार्थ्यांची संख्या किती होती आतापर्यंत शिक्षणाधिकारी यांना माहित नसावी योग्य नाही.

श्री.संजय शिरसाट : वर्ग वाईजविद्यार्थी संख्या कोणत्या शाळेत किती याची सविस्तर माहिती येणे गरजेचे आहे. नगरसेवक स्वेच्छा निधीतून संगणक देण्यात आले होते. ज्या सदस्यांच्या वार्डात शाळा होती त्या शाळेचे अध्यक्ष नगरसेवक होते. सध्या ते संगणक कुठे आहे याचीही चौकशी करावी.

मा. सभापती : किती शाळेला नगरसेवक स्वेच्छानिधीतून संगणक यंत्र दिलेले आहे तसेच कोणत्या शाळेत किती वर्ग व किती विद्यार्थी संखया तसेच शिक्षक संख्या किती आहे याची माहिती शिक्षणाधिकारी यांनी तीन दिवसात सादर करावी.

डॉ. आशा बिनवडे : माझ्या वार्डातील शाळेत शिक्षक कमी आहे. ८० विद्यार्थ्याना एक एक शिक्षक शिकवितात अनेक वेळा मागणी केली शिक्षक दिलेले नाही.

श्री.हिम्मतराव दाभाडे : मी जे घोरपडे यांनी घेतलेल्या जगेचा मुद्दा उपस्थित केला त्याची माहिती द्यावी.

मा. आयुक्त : सचिंका बघीतली सन २००३ मध्ये जगा देण्यात येवू नये असा प्रस्ताव आलेला होता परंतू स्थायी समितीने जगा द्यावी असा मंजूर केलेला आहे. किती जगेचा मोबदला दिला त्याची माहिती घेतली जईल. श्री.घोरपडे यांना तसेच स.सदस्य श्री. दाभाडे यांना उदयाच माझे दालनात सुनावणी साठी बोलविण्यात येईल.जगेचा मोबदला पण दिला व जगा पण दिली का हे आजतपासणी करून उद्या हेरींग घेतली जईल.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : तीन महिण्यापासून मजूराचे हजेरी रजिस्टरवर सहया नाही. संबधीत स्वच्छता निरीक्षक सांगतात की हजेरी रजिस्टर आहे. सदर रजिस्टर मी सभागृहात आणलेले आहे.

मा. आयुक्त : उपआयुक्त महसूल यासंबधी चौकशी करतील व सध्याकाळ पर्यत मलाअहवाल देतील. सत्य असेल तर निलंबीत करण्यात येईल. सभा संपावायचीअसेल तर ऐनवेळचा विषय जे की चार सेवा निवृत्त अधिकारी या शहरातील जगेची माहिती घेण्यासाठी नियुक्त करीत आहे तो ठराव मान्य करावा. महापालिकेची जगा असेल तर महापालिकेचे नाव त्या जगेला लागलेच पाहिजेअनेक जगा महापालिकेने विकत घेवून मोबदला दिला परंतू महापालिकेच्या नावावर नाहीत.

श्री.संजय शिरसाट : ज्या ज्या भागात आर्कीटैक्ट असतात ते नागरीक म्हणून त्यांना त्या भागात किती ओपन स्पेस आहे म्हणून माहिती घेवू शकतात. त्यांचेकडूनही माहिती घेण्यात यावी. रेल्वेस्टेशन कडे पद्मावती कॉलनीत २ एकर जगा असून प्रत्यक्ष जगेवर १० हजर स्वे. फुट जगा नाही.

मा.आयुक्त : जगे संदर्भात स्थायी समितीनेकिती ठराव मंजूर केले. नगररचना विभागाकडून माहिती घेतली जईल तसेच लेखाविभागाकडून किती जगेचे संदर्भात धनादेश दिलेले आहे तीन ही विभागाकडून माहिती घेवून कार्यवाही होईल.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : या चौकशी बरोबर ७.१२.१९८२ पासून आजपर्यंत किती लेआऊटला मान्यतादिलेली आहे याची माहिती दयावी.

मा.सभापती : स.सभासदाच्या भावना लक्षात घेता. प्रशासकीय विभागाचे एकत्रिकरण करण्यात यावे. ज्या ज्या भागात अतिक्रमण झालेले आहे ते तातडीने काढण्याची कार्यवाही व्हावी. शिक्षण विभागाच्या संदर्भात अनेक तक्रारी आहे शाळेच्या अडचणी आहे. विद्यार्थी संख्या किती, कोणत्या इमारतीचे भाडे किती, किती शाळा भाडेने, कोणत्या शाळेत किती विद्यार्थी, याची माहिती आज सभागृहाला मिळालेली नाही त्यामुळे स.सदस्यांच्या भावना लक्षात घेता दोन दिवसांसाठी आजची सभा तहकूब करण्यात येते.

या बरोबर मा. सभापती यांनी आजची सभा तहकूब केल्याचे जहीर केले.

**नगर सचिव**

महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**स्थायी समिती सभा**

**कार्यक्रम पत्रिका क्रमांक (06)**

(दि.31/7/2007 रोजीची तहकूब सभा)

**दिनांक :- 04/08/2007**

## सू च ना

दिनांक ३१/७/२००७ रोजी **तहकुब करण्यात आलेली स्थायी समितीची सभा** आता **मंगळवार दि. ०७ ऑगष्ट २००७ रोजी सकाळी ११.३० वाजता** 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे आयोजित करण्यात आलेली आहे. सभेची विषय पत्रिका (कार्यक्रम पत्रिका क्र.०६) यापुर्वीच वक्तशीर वितरीत करण्यात आलेली आहे. कृपया या सभेस वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करावे, ही विनंती.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद

**टीप :- तहकूब सभा संपल्यानंतर लगेचच दुसऱ्या सभेस (का.प.क्र.७) सुरूवात होईल.**